**प्रेस नोट** **दिनांक ३०/०३/२०१९**

## चंदननगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

### हरवलेली मुलगी तिचे आईचे ताब्यात सुखरुप परत दिले बाबत.

चंदननगर पो.स्टे.हद्दीमध्ये दिनांक २८/०३/१९ व दिनांक २९/०३/२०१९ रोजी खराडी गावचे ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ देवाची यात्रा होती. सदर यात्रेसाठी पोलीस ठाणेचा योग्य तो बंदोबस्त नेमण्यात आलेला होता. यात्रेला खराडी, थिटेवस्ती, चंदननगर, मुंढवा, वडगावशेरी वगैरे परीसरामधील नागरिक, महिला मुले पायी दर्शनासाठी येत होते. दिनांक २९/०३/२०१९ रोजी रात्रौ २०.४५ वा. चे सुमारास एक लहान मुलगी रा.खराडी, पुणे ही हरवल्याने एकटीच रडत असलेली गर्दीमध्ये पोउनि. श्रीधर भोसले, पोहवा. ३७२२, शैलेंद्र वाणी, पो.हवा. ३१४, हरीदास कदम, मपोना. ६११९, जानकी भोंडवे, पोना. २३३१, श्रीकांत करकेल्ली यांना मिळुन आली होती. त्यांनी सदर मुलीस सर्व यात्रेमध्ये बरोबर घेवुन फिरवुन, तसेच पोलीस स्टेशनकडील पिटर मोबाईलचे पीए सिस्टीमवरुन लोकांना सदर मुलीचे वर्णन व नावाबाबत माहिती देवुन तिचे आई, वडिलांचा शोध घेतला. सदर मुलीची आई सौ. सुरेखा तेंबुरने, रा. भंगाई वस्ती, खराडी, पुणे हया रात्रौ २१.३० वा. चे सुमारास मिळुन आल्याने, त्यांचे मुली बाबत खात्री करुन त्यांची मुलगी सुखरुपपणे त्यांच्या ताब्यात दिलेली आहे. मुलगी व आईने एकमेकांना पाहाताच त्यांचे दोघींनी एकमेकींना कवटाळुन, त्यांचे डोळयामधुन आनंदाश्रु तरळुन आल्याचे पाहुन उपस्थित नागरिकांनी पोलीसांचे कौतुक करुन, मुलीचे आईने पोलीसांचे आभार मानले आहेत.

सदरची चांगली कामगिरी चंदननगर पोस्टे. वपोनि. कृष्णा इंदलकर याचे मार्गदर्शनाखाली पोउनि. श्रीधर भोसले, पोहवा. शैलेंद्र वाणी, पो.हवा. हरीदास कदम, मपोना. जानकी भोंडवे, पोना. श्रीकांत करकेल्ली यांनी केली आहे. फोटो खाली सादर केलेला आहे.



